नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २५९ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार, दि. ०४ सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# जरांगे उपोषणावर ठाम

## ११ सप्टेंबरपर्यंत मुदत, मंत्र्यांच्या शिष्टमंडळाबरोबर चर्चा निष्फळ

जालना : (स. गांवकरी)

मागण्या मान्य पूर्ण होईपर्यंत उपोषण करणार. जेव्हा मागण्या मान्य होतील तेव्हा गुलाल घेऊन मंत्र्यांच्या अंगावर उधळू. पण मागण्या पूर्ण होईपर्यंत उपोषण सुरू ठेवू असे मनोज जरांगे यांनी मंत्र्यांच्या शिष्टमंडळास गुरुवारी सांगितले. गुरुवारी रात्री नऊनंतर आंतरवली सराटी येथे उपोषण स्थळी मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री उदय सामंत, आमदार प्रसाद लाड यांच्या शिष्टमंडळाने जरांगे यांच्याशी सुरु झालेली चर्चा रात्री अकरापर्यंत सुरु होती. तोपर्यंत उपोषण सोडण्याबाबतचा निर्णय जरांगे यांनी जाहीर केला नाही. उलट उपोषणावर ठामच असल्याचे त्यांनी मंत्र्यांना सांगितले. ११ तारखेपर्यंत मागण्या मान्य झाल्याबाबतची सगळी कागदपत्रे द्यावीत तसेच रद्द जात वैधता प्रमाणपत्रात पुन्हा न्याय द्यावा, अशा मागण्या जरांगे यांनी पुन्हा लावून धरल्या.

कालपर्यंत मंत्र्याशिवाय सुरू असणाऱ्या आंदोलनास रात्री नऊ वाजता शिष्टमंडळातील सर्व सदस्यांनी भेट दिली. सरकारने आतापर्यंत मराठा समाजासाठी खूप काम केले असल्याचा दावा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी केला. पण समर्थकांनी तो उडवून लावला.



सायंकाळी मंत्री उदय सामंत आणि लाड यांनी अभ्यासक जरांगे समर्थकांशी चर्चा केली. त्यानंतर विखे -पाटील आल्यावर तिघांनी जरांगे यांच्याशी यांच्याशी त्यांनी केलेल्या प्रत्येक मागणीवर चर्चा केली. मराठा विद्यार्थ्यांना ओबीसी सवलतींचा शासन आदेश काढणार , आरक्षणासाठी मंत्रालयात अधिकारी कक्ष स्थापन करणार, जात प्रमाणपत्रासाठी प्रत्येक जिल्ह्यात 'नोडल' अधिकारी नेमणार, दर मंगळवारी होणाऱ्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठक मागण्यांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणार, जात पडताळणी प्रमाणपत्रास विलंब झाला तर विद्याथ्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क परत करणार इत्यादी आश्वासने विखे -पाटील यांनी यावेळी दिली.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांचा थकलेला व्याज परतावा, आरक्षण आंदोलनात बलीदान झालेल्यांच्या वारसांना नोकऱ्या, हैदराबाद गॅझेटनुसार जात प्रमाणपत्र देणे इत्यादी मागण्यांच्या संदर्भात यावेळी चर्चा झाली. जात प्रमाणपत्रांच्या संदर्भात कोल्हापूर आणि सातारा संस्थानांचे शासन आदेश काढा, 'सारथी'च्या बंद योजना सुरु करा, वंशावळ जुळली तरी जात प्रमाणपत्रे दिली जात नाहीत याकडे लक्ष द्या, यासह अनेक मागण्या जरांगे यांनी यावेळी मांडल्या.

जात पडताळणी प्रमाणपत्रांचा मुद्दा त्यांनी प्रकर्षाने उपस्थित केला. यामुळे गुरुवारी उपोषण सुरूच राहिले. या चर्चेदरम्यान राधाकृष्ण विखे यांनी ११९४ मध्ये मंडल आयोगाच्या यादीत जर मराठा जातीला ओबीसीमध्ये टाकले असते तर प्रश्नच आला नसता. तेव्हा शरद पवार यांनी हे काम केले नाही, असा आरोप केला. मात्र, उपस्थित जरांगे समर्थकांनी हा दावा लगेच फेटाळला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मराठा समाजाला खूप काही दिल्याच्या वक्तव्याची समर्थकांनी खिल्ली उडवली. दरम्यान मागण्या मान्य करण्यासाठी आम्ही सर्व सकारात्मक आहोत, असे या वेळी सांगण्यात आले.

## निलंबित कक्षाधिकाऱ्याला विधिमंडळाच्या सेवेत घेण्याच्या हालचाली

मुंबई : (स. गांवकरी)



विधिमंडळाच्या अंदाज समितीतील आमदारांच्या धुळे दौऱ्याच्या वेळी शासकीय विश्रामगृहात १ कोटी ८४ लाख रुपयांची रोख रक्कम आढळल्यानंतर अंदाज समिती अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक तथा कक्ष अधिकाऱ्याला निलंबित करुन चौकशी समिती नेमण्यात आली होती. पण तपासातील तांत्रिक बाब पुढे करत निलंबित कक्ष अधिकाऱ्याला विधिमंडळात रुजू करुन घेण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. विधिमंडळाच्या अंदाज समितीचे सदस्य धुळे दौऱ्यावर असताना शासकीय विश्रामगृहाच्या कक्षात १ कोटी ८४ लाख रुपयांची रक्कम आढळली होती. ही रक्कम ठेकेदार व अधिकाऱ्यांकडून गोळा केली होती आणि ती आमदारांना वाटण्यासाठी ठेवली होती, असा आरोप माजी आमदार अनिल गोटे यांनी केला होता. गोटे यांनी विश्रामगृहात आंदोलन केल्याने पोलिसांना समिती अध्यक्ष खोतकरांच्या स्वीय सचिवाच्या कक्षाची रोख रक्कम आढळली होती. या प्रकारानंतर अंदाज समिती अध्यक्ष व शिवसेना (शिंदे) आमदार अर्जून खोतकर यांचे स्वीय सहायक असलेले विधिमंडळाचे कक्षाधिकारी किशोर का. पाटील यांना निलंबीत करण्यात आले होते. तसेच समित्यांच्या दौऱ्यांवर बंदी घालण्यात आली होती. आमदारांसाठी आचरण निश्चिती करण्यासाठी नितीमूल्य समिती स्थापन केली होती. किशोर पाटील यांची चौकशी करण्यासाठी विधिमंडळाचे सचिव क्र. ४ शिवदर्शन साठ्ये यांची एकसदस्यीय समिती नेमण्यात आली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणाची विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याची घोषणा केली होती. विधिमंडळाच्या साठ्ये समितीने चार महिन्यानंतर अहवाल सुपूर्द केला आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास पूर्ण केला नाही. तपास पूर्ण नसल्याने आरोपपत्र दाखल झालेले नाही. त्यामुळे समितीने आपल्या अहवालात कोणताही निष्कर्ष नोंदवलेला नाही. परिणामी, निलंबीत कक्षाधिकारी किशोर पाटील यांना पुन्हा सेवेत रुजू करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला. तो मान्यतेसाठी विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर यांच्याकडे दोन महिन्यांपूर्वी सादर झाला आहे. अध्यक्षांच्या मंजुरीनंतर किशोर पाटील हे विधिमंडळात कक्षाधिकारी पदावर रुजू होतील.

## थोडक्यात...

### 'दादांच्या जाण्यावर राजकारण करू नका'

पुणे (स. गांवकरी) : "अजित पवार यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी आणि कोसळलेले दुःख काय आहे, हे माझ्या आणि माझ्या मुलांपेक्षा अधिक कोणाला माहीत असणार,' असे सांगून, 'त्यामुळे आम्हाला काही वाटत नाही किंवा आम्ही काहीच करत नाही, असा समज करून घेण्याचे कारण नाही. दादांच्या जाण्याबाबत सर्वांनाच वस्तुस्थिती जाणून घ्यायची आहे आणि त्या दृष्टीने आम्ही पाठपुरावा करत आहोत," असे स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गुरूवारी दिले. खासदार सुप्रिया सुळे यांनी 'माझा भाऊ गेला आणि काही आमदार सत्ता भोगत आहेत,' अशी टीका केली होती. या टीकेसंदर्भात पत्रकारांनी विचारणा केली असता, सुनेत्रा पवार यांनी हे स्पष्टीकरण दिले. "अजितदादांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्रासह आमच्यावर आकाश कोसळले आहे. दादांच्या आई, त्यांची मुले आणि माझ्यापेक्षा हे दुःख कोणाला जास्त असणार? दादांच्या जाण्यावर कोणीही राजकारण करू नये आणि वारंवार माध्यमांसमोर जाऊन 'मीडिया ट्रायल' चालवू नये," असा टोलाही पवार यांनी खासदार सुप्रिया सुळे यांचे नाव न घेता लगावला.

### DJ विरोधात आक्रमक कारवाई

पुणे (स. गांवकरी) : पुण्यात डीजेच्या मोठ्या आवाजाविरोधात वातावरण तापलेले असतानाच पुणे पोलिसांनी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर पावले उचलली आहेत. लोहियानगर परिसरात पोलीस आयुक्तांच्या आदेशाचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात डीजे वाजवल्याप्रकरणी मंडळाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि साऊंड सिस्टीम मालकावर कारवाई करण्यात आली. खडक पोलिसांच्या कारवाईनंतर या तिघांना न्यायालयाने दोषी ठरवत शिक्षा सुनावली. लोहियानगर कमानीजवळील सार्वजनिक रस्त्यावर अल मदिना यंग बॉईज मंडळाकडून मोठ्या आवाजात डीजे वाजवण्यात आला. यावेळी मोठ्या प्रमाणात गर्दी जमवून नागरिकांना त्रास होईल, अशा पद्धतीने गोंगाट आणि उपद्रव केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी साऊंडचा आवाज कमी करण्याबाबत वारंवार सूचना दिल्या. मात्र, त्यानंतरही साऊंडचा आवाज कमी करण्यात आला नसल्याचे पोलिसांच्या कारवाईत समोर आले.


### 'यूपीएससी'ची असमर्थता

नाशिक (स. गांवकरी) :देशातील उच्चपदस्थ सनदी अधिकाऱ्यांच्या निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा पूर्वपरीक्षेत सर्व प्रादेशिक भाषांमध्ये प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देण्यास केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) असमर्थता दर्शविली आहे. 'यूपीएससी'च्या महत्त्वाच्या नागरी सेवा पूर्व परीक्षेतील 'सामान्य अध्ययन पेपर-१' आणि 'सामान्य अध्ययन पेपर-२' (सीसॅट) या दोन्ही प्रश्नपत्रिका मराठीसह संविधानाच्या आठव्या अनुसूचीतील सर्व भारतीय भाषांमध्ये उपलब्ध करून द्याव्यात, यासाठी महाराष्ट्रातील विद्यार्थी पाठपुरावा करीत आहेत. या संदर्भातील निवेदनाला 'यूपीएससी'ने दिलेल्या उत्तरामुळे त्यांचा भ्रमनिरास झाला. बहुभाषिक देशात राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक परीक्षेत सर्व भाषिक विद्यार्थ्यांना समान आणि न्याय्य संधी मिळणे आवश्यक आहे. आयोगाची नागरी सेवा परीक्षा ही देशातील सर्वोच्च आणि अत्यंत महत्त्वाची स्पर्धात्मक परीक्षा आहे. या माध्यमातून भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा तसेच इतर केंद्रीय सेवांसाठी उमेदवारांची निवड केली जाते. त्यामुळे या परीक्षेची प्रक्रिया देशातील विविध भाषिक आणि सामाजिक पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांसाठी शक्य तितकी समावेशक असणे आवश्यक आहे, याकडे विद्यार्थ्यांनी निवेदनातून लक्ष वेधले होते.

## आरोग्यसेवांच्या बळकटीसाठी 'आरोग्य आयुक्तालय'

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यातील शहरी भागांतील आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी, त्याचप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आरोग्य उपक्रमांची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी यासाठी 'शहरी आरोग्य आयुक्तालय' स्थापन करण्यात आले आहे. राज्यातील महापालिका, नगरपरिषद, नगरपंचायती आणि कटक मंडळांच्या कार्यक्षेत्रात नागरिकांना शहरी आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे पुरविण्याची जबाबदारी या आयुक्तालयावर सोपविण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एप्रिल २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरू करण्यात आले. त्यानंतर राज्यात 'राज्य आरोग्य अभियान' आणि त्याअंतर्गत 'राज्य आरोग्य सोसायटी'ची स्थापना करण्यात आली. याअंतर्गत राज्य सरकारने शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्यास मान्यता



दिली आहे. त्याचप्रमाणे संबंधित आयुक्तांची कर्तव्ये आणि जबाबदारीही निश्चित करण्यात आली आहे. यानुसार राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाच्या मार्गदर्शक सूचना, केंद्र व राज्य शासनाचे शहरी आरोग्यविषयक धोरण प्रभावीपणे राबविणे, शहरी आरोग्य सेवा बळकट करणे तसेच राष्ट्रीय व राज्य आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आणि त्याद्वारे आरोग्य सेवांच्या गुणवत्तेत व परिणामकारकतेत वाढ करण्याची जबाबदारी आरोग्य आयुक्तालयावर असणार आहे.

## पालकमंत्रीपद मिळाले तरी रायगडमध्ये महायुतीत संघर्ष कायम

अलिबाग : (स. गांवकरी)

रायगडचे पालकमंत्रीपद शिवसेनेला मिळूनही, महायुतीमधील शिवसेना राष्ट्रवादी मधील वाद थांबण्याची चिन्ह दिसत नाहीत. दोन्ही पक्षात शाब्दीक चकमकी सुरूच आहेत. महत्वाची बाब म्हणजे दिवसेंदिवस टिकेची पातळी घसरत चालली आहे.

जवळपास दीड वर्षाच्या टोकाच्या संघर्षानंतर रायगडचे पालकमंत्रीपद अखेर शिवसेनेकडे सोपविण्यात आले. राज्याचे रोजगार हमी आणि फलोत्पादन मंत्री भरत गोगावले रायगडचे पालकमंत्री झाले. यानंतर शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यातील वादाला पूर्णविराम मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र पालकमंत्रीपदाचा तिढा सुटूनही दोन्ही पक्षांमधील वाद थांबण्याची शक्यता दिसत नाही. अलिबागचे शिवसेना आमदार महेंद्र दळवी यांनी तटकरे कुटूंबिया विरोधातील आक्रमक पवित्रा कायम ठेवला आहे. जिल्हा परिषद निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकूनही तटकरे यांनी शिवसेनेला



अध्यक्षपद मिळू दिले नव्हते. आमदार दळवी यांच्या पत्नी मानसी दळवी या जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या शर्यतीत होत्या. पण अध्यक्षपद भाजपला गेल्याने, दळवी यांच्या अध्यक्ष होण्याच्या अपेक्षावर पाणी फेरले गेले. त्यानंतर आमदार दळवी यांची कन्या जुईली दळवी हीला विधान परिषदेच्या कोकण स्थानिक स्वराज्य संस्थाच्या मतदारसंघातून महायुतीची उमेदवार म्हणून संधी मिळावी यासाठी आमदार दळवी आग्रही होते. पण तटकरे यांनी आपला राजकीय अनुभव पणाला लावून ही जागा राष्ट्रवादी काँग्रेससाठी मिळवली. जुईली दळवी यांना निवडणुकीतून माघार घेण्यास भाग पाडले. अनिकेत तटकरे यांना बिनविरोध निवडून आणले. यामुळे आमदार दळवी चांगलेच संतापले आहेत. त्यामुळे पालकमंत्री पद शिवसेनेला मिळूनही त्यांनी तटकरे यांच्या विरोधातील आक्रमकतेची धार कमी होऊ दिलेली नाही.

आमदार अनिकेत तटकरे हे सरोगसी बाळ असल्याची टिप्पणी दळवी यांनी माध्यमांशी संवाद साधतांना केली. शिवसेनेच्या उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली नसती तर अनिकेत तटकरे आमदारच झाले नसल्याची टीका दळवी यांनी केली. यानंतर अनिकेत तटकरे यांनी दळवींवर निशाणा साधला. दळवी यांनी सरोगसी हा शब्द आधी नीट लिहून दाखवावा, असे आवाहन त्यांनी दिले. दळवींच्या वक्तव्यातून त्यांची संस्कृती दिसून येते. आमदार दळवी त्यांच्या पत्नीला जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद मिळावे यासाठी दिल्लीपर्यंत आमचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या घरी फेऱ्या मारत होते असा दावाही केला. त्यामुळे दोन्ही पक्षातील वाद पुन्हा उफाळून आला आहे. एकमेकांवर टिकाटिप्पणी करतांना टिकेचा स्तरही खालावू लागला आहे. दरम्यान तटकरे कुटूंब आणि दळवी यांच्यातील हा वाद वैयक्तिक टिका टिप्पणी पुरता मर्यादीत राहतोय, की त्याचे व्यापक पडसाद जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात उमटणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# स्टार रेटिंग प्रणालीचा उपयोग दर्जेदार आरोग्यसेवेसाठी व्हावा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : (स. गांवकरी)

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड, एकात्मिक आरोग्य सुविधा केंद्र आणि रुग्णालयांच्या स्टार रेटिंग प्रणाली या तीन महत्वपूर्ण उपक्रमांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी शुभारंभ करण्यात आला. राज्यातील आरोग्यविषयक माहितीचे केवळ संकलन न करता तिचा लोकहितासाठी व्हावा. या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी विभागाने काम करावे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या तंत्रज्ञानाधारित आणि नागरिककेंद्री उपक्रमांचे कौतुक केले.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध कार्यक्रमांसाठी सध्या ४० हून अधिक स्वतंत्र पोर्टल कार्यरत आहेत. या पोर्टलवरील महत्त्वाची माहिती एकत्रित करून एकाच व्यासपीठावर उपलब्ध करण्यासाठी एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड विकसित करण्यात आला आहे. माता व बाल आरोग्य, क्षयरोग नियंत्रण, असंसर्गजन्य आजारांची तपासणी आदी कार्यक्रमांशी संबंधित प्रमुख निर्देशांकांचे राज्य तसेच जिल्हानिहाय विश्लेषण या डॅशबोर्डवर करता येणार आहे. यामुळे आरोग्यविषयक आव्हाने तातडीने ओळखणे, जिल्हानिहाय कामगिरीचे मूल्यमापन करणे आणि आवश्यक ठिकाणी परिणामकारक उपाययोजना करणे अधिक सुलभ होणार आहे. आरोग्यविषयक माहितीचे रूपांतर



कृतीयोग्य डेटामध्ये होऊन प्रशासकीय निर्णय अधिक अचूक आणि गतिमान होणार आहेत. एकात्मिक आरोग्य सुविधा केंद्राच्या माध्यमातून '१०४' कॉल सेंटरचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. नागरिकांकडून येणाऱ्या दूरध्वनींसह आरोग्य विभागाकडून करण्यात येणाऱ्या संपर्क कॉल्सचेही नियोजन या केंद्रातून होणार आहे. अतिजोखमीच्या गर्भवती माता, प्रसूतीनंतरच्या माता, क्षयरुग्ण तसेच असंसर्गजन्य आजारांशी संबंधित नागरिकांचा पाठपुरावा करण्याबरोबरच रुग्णालयातील सेवांविषयी नागरिकांचे अभिप्राय जाणून घेतले जाणार आहेत. या केंद्रात दैनंदिन सुमारे एक हजार कॉल्स हाताळण्याची व्यवस्था असून त्यासाठी प्रशिक्षित ऑपरेटर्स कार्यरत राहणार आहेत. गंभीर अथवा तातडीच्या प्रकरणांची माहिती संबंधित जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना तत्काळ कळविण्याची यंत्रणाही विकसित करण्यात आली आहे.

राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये उपलब्ध होणाऱ्या सेवांचे प्रमाणीकरण आणि गुणवत्तावाढ करण्यासाठी स्टार रेटिंग प्रणाली सुरू करण्यात आली आहे. विशेष सेवांची उपलब्धता, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, औषधांचा पुरवठा, प्रयोगशाळा सेवा, बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवा, प्रसूती व शस्त्रक्रियांची संख्या, स्वच्छता, सुविधांची उपयुक्तता आणि रुग्णांचे अभिप्राय अशा विविध निकषांवर आरोग्य संस्थांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे.

या प्रणालीमुळे नागरिकांना रुग्णालयांमध्ये उपलब्ध सेवांची सर्वसमावेशक माहिती घरबसल्या मिळेल. शिवाय या व्यवस्थेत नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या माहितीवर आवश्यकतेनुसार जिल्हास्तरावर तातडीने कार्यवाही करण्याची तसेच त्यानंतर नागरिकांशी संपर्क साधून सेवा मिळाल्याची खात्री करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे सेवा दिली का यासोबतच सेवा मिळाली का यावरही लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

महा पल्स एआयसाठी कोल्हापूरची पथदर्शी प्रकल्पासाठी निवड करण्यात आली असून यामुळे येथील आरोग्य व्यवस्था स्मार्ट होणार आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड देत हा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील १०४ शासकीय आरोग्य संस्था आणि १२ तालुक्यांना एका एकात्मिक डिजिटल प्रणालीशी जोडण्याच्या या उपक्रमामुळे आरोग्य सेवांचे निरीक्षण, उपलब्ध संसाधनांचे व्यवस्थापन आणि नागरिकांना मिळणाऱ्या सेवांचा पाठपुरावा अधिक प्रभावी होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# शहरात पुन्हा अतिक्रमणावर हातोडा कोसळला!





**कोपरगाव : (स. गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांचे आदेशाने नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्या प्रसिद्ध नोटीसीनुसार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी यासंबंधीची अंतिम जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येऊन आज दुपारी 04 वाजेपर्यंत सुमारे 70 अतिक्रमणे हटवली होती उशिरा आलेल्या माहितींनुसार आज 150 अतिक्रमणे जमिनोध्वस्त केली असल्याची माहिती मुख्याधिकारी अजित निकत यांनी आज आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे. उद्याही मोहीम सुरू राहणार असून आगामी काळात यावर राजकारण होणार अशी चिन्हे दिसू लागली आहे.

कोपरगाव शहरातील सार्वजनिक रस्ते आणि मोकळ्या जागांवरील अतिक्रमण हा नागरिकांसाठी अत्यंत चिंतेचा आणि डोकेदुखीचा विषय ठरला आहे.रस्त्यालगत असलेल्या अतिक्रमणामुळे शहरात वारंवार वाहतूक कोंडी होत होती.परिणामी मुख्य बाजारपेठ आणि सार्वजनिक रस्त्यांवर व्यापाऱ्यांनी व टपऱ्यांनी केलेल्या अतिक्रमणामुळे रस्ते अरुंद झाले असून, दैनंदिन वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर वाढली असल्याचे दिसून आले होते. परिणामी पादचाऱ्यांची गैरसोय होत होती.त्यातच मोकाट जनावरांमुळे मागील सप्ताहात दोन नागरिकांचे बळी गेले असल्याने हा विषय अधिक



संवेदनशील बनला असल्याचे उघड झाले आहे.शहरातील फुटपाथ आणि रस्त्यांच्या कडेला झालेल्या अनधिकृत बांधकामांमुळे पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून मुख्य रस्त्यावरून चालावे लागते. सध्याच्या सणासुदीच्या काळात बाजारपेठेत गर्दी वाढत असल्याने या अतिक्रमणांमुळे नागरिक आणि वाहनधारकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत होता.अनेक नागरिकांचे आणि प्रवाशांचे हकनाक बळी जात होते.या गंभीर समस्येची दखल घेत कोपरगाव नगरपरिषदेने ३ सप्टेंबर २०२६ पासून शहरात दोन दिवसांची धडक अतिक्रमण हटाव मोहीम सुरू केली आहे. याला नगराध्यक्ष पराग संधान यांनी दुजोरा दिला आहे. अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांचे आदेशाने नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्या प्रसिद्ध नोटीसीनुसार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी यासंबंधीची अंतिम जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली होती.त्यानुसार ही नोटीस हीच अंतिम नोटीस समजली जाणार होती.त्यामुळे स्वतंत्र नोटीस दिली जाणार नव्हती.त्यानुसार आज ही कारवाई सकाळी 10.30 वाजता मुख्य रस्त्यावर गोदावरी नजीक असलेल्या स्वामी समर्थ सेवा केंद्रापासून करण्यात आली होती. त्यासाठी कोपरगाव नगरपरिषदेचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे सुमारे 140 कर्मचाऱ्यांचे दोन ग्रुप करण्यात आले होते.याशिवाय पोलिस निरीक्षक उद्धव डमाळे यांचे 08 अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश होता.त्यात कोपरगाव येथील महात्मा गांधी चौकातील सुदेश टॉकीज समोर असलेल्या मनसेचे वाचनालय आणि अन्य दुकानांचा समावेश आहे. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक, विघ्नेश्वर चौक, गुरुद्वारा रोड,तहसील मैदान, इंदिरा पथ,बस स्थानक परिसर,मुख्य रस्ता,स्टेशन रोड,येवला रोड,कृषी उत्पन्न बाजार समिती समोरील खडकी रोड,बैल रोड,संजयनगर आदि ठिकाणी दोन उत्खनक आणि दोन ट्रॅक्टर,एक हायवा आदींनी आपला हातोडा चालवला असून अनेक रस्त्यांचा श्वास मोकळा केला आहे.त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.तर उद्या गांधीनगर परिसरातील एस.जी.रोड परिसरातील अतिक्रमण हटविण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी निकत यांनी दिली आहे. दरम्यान यापूर्वी 10 मार्च 2011 रोजी कोपरगाव शहरातील सुमारे दोन हजार अतिक्रमण धारकांचे अतिक्रमण हटविले होते. त्यानंतर अनेकाना या शहरातून परागंदा व्हावे लागले होते.त्यामुळे त्यानंतर संपन्न झालेल्या नगरपरिषद आणि विधानसभेच्या निवडणुकात त्यांचे मोठे राजकारण झाले होते. अनेक नेत्यांनी खोटीनाटी भूमिपूजन करून आपल्या राजकारणाच्या आणि सत्तेच्या भाकरी भाजल्या होत्या.त्यानंतर आ.आशुतोष काळे यांनी कोपरगाव बसस्थानक आणि नगरपरिषदेसमोर व्यापारी गळे बांधून काही अंशी दिलासा दिला आहे.तर फ्रुट मार्केट मात्र अपयशी ठरले आहे.त्याचे अवाजवी दर कोणालाही परवडणारे ठरले नव्हते. आज हीच मंडळी सत्तेत असून आता आगामी काळात याबाबत सदर विस्थापित नेमकी कोणती भूमिका घेणार याकडे शहरातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

दरम्यान याबाबत मात्र ज्यांनी लाखो रुपयांची मोठी गुंतवणूक करून व्यापारी संकुलात गाळे बांधले त्या स्थायी व्यापाऱ्यांनी मात्र समाधान व्यक्त केले आहे.कारण बऱ्याच वेळा अस्थायी दुकानदार स्थायी दुकानदारांसमोरच आपला प्रपंच मांडून आपला हजारो रुपयांचा व्यवसाय करत असून हा स्थायी व्यापाऱ्यावर मोठा अन्याय ठरत होता.

# थोडक्यात पण महत्वाचे



## भारतातील खो-खो क्रांतीला बळ


पुरी (स. गांवकरी) : ओडिशा AM/NS इंडिया खो-खो हाय परफॉर्मन्स सेंटरने ओडिशा सरकारच्या क्रीडा आणि युवक सेवा विभाग (DSYS), खो-खो फेडरेशन ऑफ इंडिया (KKFI) आणि ओडिशा खो-खो असोसिएशन (OKKA) यांच्या सहकार्याने आयोजित केलेली ओडिशा AM/NS इंडिया ज्युनिअर खो-खो चॅम्पियनशिप 2026 ही स्पर्धा 31 ऑगस्ट 2026 रोजी तीन दिवसांच्या आकर्षक सामन्यानंतर पार पडली. ज्युनिअर मुले आणि ज्युनिअर मुली या श्रेणींमधील 12 संघांचा सहभाग असलेल्या या चॅम्पियनशिपमध्ये 180 उगवत्या खेळाडूंनी एकत्र येत वेग, कौशल्य, शिस्त आणि संघभावनेचे प्रदर्शन केले. 29 ऑगस्ट 2026 रोजी झालेला उद्घाटन सोहळा राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून पार पडला, ज्यामुळे या कार्यक्रमाचा उत्साह आणखी वाढला. या सोहळ्याला मुख्य अतिथी म्हणून KKFI चे अध्यक्ष श्री सुधांशु मित्तल उपस्थित होते. सन्माननीय अतिथी म्हणून KKFI चे उपाध्यक्ष आणि OKKA चे सचिव श्री प्रद्युम्न मिश्रा, आंध्र प्रदेश खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष श्री एम.व्ही.एस.एस. प्रसाद आणि AM/NS इंडियाचे CSR प्रमुख डॉ. विकास यादवेंदू उपस्थित होते.



## ऊर्जा क्षेत्रातील नवोन्मेषाला 'MC²+ IGNITE'ची नवी दिशा

पुणे (स. गांवकरी) : भारतातील ऊर्जा क्षेत्रातील डीप-टेक नवोन्मेषाला चालना देण्यासाठी इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (इंडियनऑइल), व्हेंचर सेंटर आणि सीएसआयआर-नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (सीएसआयआर-एनसीएल) यांच्या संयुक्त विद्यमाने 'MC²+ IGNITE' या ऊर्जा नवोन्मेष प्रवेगक कार्यक्रमाच्या पुणे आउटरीचचे आयोजन करण्यात आले. 'Advancing Energy Innovations' या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमाला ऊर्जा क्षेत्रातील कंपन्या, संशोधन संस्था, डीप-टेक स्टार्ट-अप्सचे संस्थापक आणि वैज्ञानिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पद्मविभूषण डॉ. आर. ए. माशेलकर यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना तो योग्य वेळी सुरू झालेला आणि परिवर्तनकारी उपक्रम असल्याचे सांगितले. भारतातील ऊर्जा कंपन्यांनी नवोन्मेषकांना प्रयोगशाळा, अत्याधुनिक सुविधा, मार्गदर्शन, भांडवल आणि बाजारपेठेपर्यंत पोहोच उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. भारताचा प्रवास 'Make in India'पासून 'Innovate in India' आणि पुढे 'Own in India'कडे झाला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

## पालकत्व, विश्वास आणि नात्यांची गुंतागुंत उलगडणारा 'अडकित्ता'




मुंबई (स. गांवकरी) : पालकत्व, विश्वास आणि जिव्हाळ्याच्या नात्यांमधील गुंतागुंत उलगडणारा 'अडकित्ता' हा नवा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. आशुतोष परांडकर दिग्दर्शित या चित्रपटाचा प्रीमियर ११ सप्टेंबर २०२६ रोजी केवळ झी5वर होणार आहे. सई ताम्हणकर, सिद्धार्थ चांदेकर आणि सखी गोखले यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट कुटुंब, करिअर, पालकत्व आणि नात्यांतील विश्वास यांचा भावनिक वेध घेणार आहे. मंगेश पवार अँड कंपनी आणि जॅकपॉट एंटरटेनमेंट निर्मित 'अडकित्ता'मध्ये आजच्या शहरी जीवनातील वास्तव आणि पालकत्वासमोरील आव्हाने प्रभावीपणे मांडण्यात आली आहेत. करिअर आणि कुटुंब यांचा समतोल साधताना तरुण जोडप्याला करावी लागणारी धडपड, त्यातून निर्माण होणारे ताणतणाव आणि दुसऱ्यावर वाढत जाणारे अवलंबित्व या सगळ्याचा प्रवास चित्रपटात पाहायला मिळणार आहे. गौतम आणि कस्तुरी हे स्वतंत्र विचारांचे आणि करिअरला प्राधान्य देणारे जोडपे. मूळ गावापासून दूर त्यांनी स्वतःचे सुखी आयुष्य उभे केले आहे. मात्र मूल होण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांच्या आयुष्याला वेगळे वळण मिळते. कठीण गर्भावस्थेनंतर त्यांचा मुलगा ओंकारचा मुदतपूर्व जन्म होतो. त्यानंतर नव्या पालकत्वाची जबाबदारी आणि व्यावसायिक आयुष्य यांचा समतोल साधताना दोघांची मोठी कसरत सुरू होते. ओंकारची काळजी घेण्यासाठी ते मंगल नावाच्या नॅनीची मदत घेतात. सुरुवातीला मंगल त्यांच्यासाठी मोठा आधार ठरते. मात्र हळूहळू गौतम आणि कस्तुरी तिच्यावर अधिकाधिक अवलंबून राहू लागतात. त्याचबरोबर त्यांच्या घरातील दैनंदिन व्यवहार, निर्णय आणि सवयींवरही मंगलचा प्रभाव वाढत जातो. मदत म्हणून घरात आलेली व्यक्ती कधी त्यांच्या आयुष्यावर नियंत्रण ठेवू लागते, हे त्यांनाही कळत नाही. यामुळे साधी वाटणारी पालकत्वाची कथा पुढे विश्वास, परावलंबित्व, कुटुंबातील नात्यांच्या मर्यादा आणि भावनिक संघर्ष यांचा उत्कंठावर्धक प्रवास बनते. मंगलची भूमिका साकारणारी सई ताम्हणकर हिने आपल्या भूमिकेबद्दल सांगितले की, मंगलच्या व्यक्तिमत्त्वात वरवर दिसते त्यापेक्षा बरेच काही दडलेले आहे. प्रेमाच्या समान धाग्यामुळे वेगवेगळ्या विचारांची आणि स्वभावाची माणसे एकाच भूमिकेवर कशी येतात, हे चित्रपटात सुंदरपणे मांडले आहे.

# द वेल्थ कंपनीकडून मल्टी कॅप फंड लॉँच

**मुंबई : (स. गांवकरी)**

- लार्ज, मिड आणि स्मॉल कॅपमध्ये गुंतवणुकीतून बाजारपेठेतील विविध चक्रांतील संधी साधण्यावर भर

द वेल्थ कंपनी म्युच्युअल फंडने 'द वेल्थ कंपनी मल्टी कॅप फंड' या नव्या ओपन-एंडेड इक्विटी योजनेची घोषणा केली आहे. दीर्घकालीन भांडवली वाढीच्या उद्देशाने लार्ज कॅप, मिड कॅप आणि स्मॉल कॅप कंपन्यांमध्ये गुंतवणूक करणाऱ्या या योजनेचा न्यू फंड ऑफर (NFO) २७ ऑगस्ट २०२६ रोजी खुला झाला असून १० सप्टेंबर २०२६ रोजी बंद होणार आहे. त्यानंतर २१ सप्टेंबरपासून योजनेत नियमित व्यवहार सुरू होतील. मल्टी कॅप फंडाच्या माध्यमातून बाजारातील वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये निर्माण होणाऱ्या संधींचा फायदा घेण्यावर या योजनेचा भर आहे. नियामक चौकटीप्रमाणे लार्ज, मिड आणि स्मॉल कॅपमध्ये प्रत्येकी किमान २५ टक्के गुंतवणूक ठेवणे आवश्यक असते. या फंडमध्ये तिन्ही विभागांमध्ये प्रत्येकी २५ ते ५० टक्क्यांपर्यंत अंदाजित गुंतवणूक वाटप ठेवण्यात येणार आहे. द वेल्थ कंपनी म्युच्युअल फंडच्या संस्थापक, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मधू लुनावत म्हणाल्या, "मार्केट कॅपिटलायझेशन हा केवळ एक आकडा आहे; तो गुंतवणुकीचा सिद्धांत नाही. एखादी मोठी कंपनी आज मजबूत असली तरी तिच्या वाढीची क्षमता मर्यादित असू शकते, तर एखाद्या छोट्या कंपनीत भविष्यातील मार्केट लीडर होण्याची क्षमता असू शकते. त्यामुळे दीर्घकाळ मूल्य निर्माण करण्याची क्षमता, व्यवस्थापनाची गुणवत्ता आणि स्पर्धात्मक ताकद असलेल्या व्यवसायांचा शोध घेणे महत्त्वाचे आहे." या योजनेत मूलभूत संशोधनावर आधारित सक्रिय गुंतवणूक धोरण स्वीकारण्यात येणार आहे.

# महिला नेतृत्वाला बळ : देशसेवा फाऊंडेशनची कार्यकारिणी जाहीर

## पदाधिकाऱ्यांची मजबूत टीम सज्ज : नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शपथ व नियुक्तीपत्र प्रदान; सर्व नियुक्त्या सर्वानुमते



**पुणे : (स. गांवकरी)**

समाजसेवेच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या देशसेवा फाऊंडेशनच्या नूतन कार्यकारिणीची घोषणा मोठ्या उत्साहात करण्यात आली. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना त्यांच्या पदाची तसेच संस्थेच्या कामकाजातील गोपनीयतेची शपथ देण्यात आली. फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. नरेंद्र पारखे आणि सचिव श्री. अमोल हांडे यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. देशसेवा फाऊंडेशनच्या कार्यकारिणीत नरेंद्र पारखे (संस्थापक अध्यक्ष), शारदा शेळके, (उप अध्यक्षा), अमोल हांडे (सचिव), संजय कैकाडे (खजिनदार), पूर्वा हांडे (सभासद व पुणे जिल्हा महिला अध्यक्ष), हर्षा कैकाडे (सभासद व पुणे शहर महिला उपाध्यक्ष), ओंकार पारखे (सभासद व पर्वती मतदार संघ अध्यक्ष), राजेश माने (पुणे शहर अध्यक्ष), सुरेखा मते (पुणे शहर महिला अध्यक्षा), अस्मिता पारखे (महिला समन्वयक), भारत शाह (महाराष्ट्र समन्वयक), प्रतिक गंगणे (खडकवासला विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष), नीलम कुलकर्णी (शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ अध्यक्षा), वंदना कोर्टीकर (कोथरूड विधानसभा मतदार संघ अध्यक्षा) मंजुषा आवळकंठे (पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघ अध्यक्षा), ज्ञानेश्वर शिंदे (वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष), संगीता शिंदे (मावळ विधानसभा मतदारसंघ अध्यक्षा आणि शिवानी आवळकंठे (प्रसिद्धी माध्यम प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांची नियुक्ती करण्यात आली. या सर्व नियुक्त्या सर्वानुमते करण्यात आल्याचे संस्थापक अध्यक्ष श्री. नरेंद्र पारखे यांनी जाहीर केले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी फाऊंडेशनच्या ध्येयधोरणांनुसार समाजहितासाठी प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. आगामी काळात देशसेवा फाऊंडेशनच्या माध्यमातून सामाजिक, महिला सक्षमीकरण, युवक, गरजू नागरिक तसेच विविध जनहिताच्या विषयांवर व्यापक उपक्रम राबविण्यात येणार असून, पुण्यासह महाराष्ट्रातील विविध भागांत फाऊंडेशनचे सामाजिक कार्य अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# 'सोलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया' अंतिम टप्प्यात; डिव्हाईन सोलिटेअर्सच्या ऑफर्समुळे ग्राहकांचा उत्साह वाढला

**मुंबई : (स. गांवकरी)**

डिव्हाईन सोलिटेअर्सचा प्रमुख वार्षिक ग्राहक महोत्सव 'द सोलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया २०२६' आता अंतिम आठवड्यात दाखल झाला असून, विशेष उत्सवी ऑफर्समुळे नैसर्गिक हिऱ्यांच्या सोलिटेअर्सच्या खरेदीला आणखी चालना मिळत आहे. देशभरातील २०० हून अधिक भागीदार ज्वेलरी स्टोअर्सच्या माध्यमातून १ ऑगस्ट २०२६ रोजी सुरू झालेला हा महिनाभराचा महोत्सव आता समारोपाच्या दिशेने वाटचाल करत आहे. महोत्सवाच्या अंतिम टप्प्यात ग्राहकांसाठी डिव्हाईन सोलिटेअर्सने विशेष फायदे जाहीर केले आहेत. २७ आणि २८ ऑगस्ट रोजी खरेदी करणाऱ्या ग्राहकांना निश्चित भेटवस्तूंमध्ये विशेष अपग्रेड मिळणार आहे. तसेच दागिन्यांना वैयक्तिक स्पर्श देऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना या दोन दिवसांत त्यांच्या नावाचे आद्याक्षर विनामूल्य कोरून घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सेवेसाठी साधारणपणे ₹२,५०० ते ₹३,००० खर्च येतो. 'सोलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया'चा उद्देश ग्राहकांना प्रमाणित नैसर्गिक हिऱ्यांच्या सोलिटेअर्सच्या माध्यमातून जीवनातील खास क्षण साजरे करण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे. त्याचबरोबर ग्राहक आणि देशभरातील भागीदार ज्वेलर्स यांच्यातील संबंध अधिक दृढ करण्यासाठीही या महोत्सवाची महत्त्वाची भूमिका आहे.

डिव्हाईन सोलिटेअर्सचे व्यवस्थापकीय संचालक जिग्नेश मेहता म्हणाले, "सोलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया हा ग्राहक आणि आमच्या रिटेल पार्टनर्ससाठी महत्त्वाचा वार्षिक उत्सव बनला आहे. नैसर्गिक हिऱ्यांच्या सोलिटेअर्सच्या माध्यमातून जीवनातील विशेष क्षण साजरे करण्यासाठी ग्राहक या महोत्सवाची आतुरतेने वाट पाहतात. अंतिम आठवड्यात प्रवेश करताना ग्राहकांना आमच्या पार्टनर स्टोअर्सना भेट देण्यासाठी आणि आकर्षक उत्सवी फायदे व बक्षिसांसह त्यांच्या आवडीचे सोलिटेअर्स खरेदी करण्यासाठी आणखी एक संधी देताना आम्हाला आनंद होत आहे."

महोत्सवाच्या कालावधीत सहभागी भागीदार स्टोअर्समधून डिव्हाईन सोलिटेअर्सचे दागिने खरेदी करणाऱ्या ग्राहकांना निश्चित भेटवस्तू दिल्या जात आहेत. तसेच त्यांना साप्ताहिक लकी ड्रॉमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. महोत्सवाच्या अखेरीस होणाऱ्या ग्रँड बंपर प्राइज ड्रॉमधील विजेत्याला XUV 7XO कार बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे. पुन्हा खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठीही विशेष लॉयल्टी लाभ देण्यात आला आहे. 'द सोलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया'च्या मागील कोणत्याही आवृत्तीत खरेदी केलेल्या ग्राहकांना त्यांच्या निश्चित भेटवस्तूमध्ये एका गिफ्ट स्लॅबचे अपग्रेड मिळणार आहे. तर २०२३ पासूनच्या मागील सलग दोन आवृत्त्यांमध्ये खरेदी केलेल्या ग्राहकांना त्यांच्या सातत्यपूर्ण सहभागाबद्दल दोन गिफ्ट स्लॅबचे विशेष अपग्रेड देण्यात येणार आहे. डिव्हाईन सोलिटेअर्सच्या प्रत्येक सोलिटेअरसोबत ब्रँडची १२३-पॅरामीटर गुणवत्ता हमी दिली जाते. यामुळे ग्राहकांना प्रमाणित नैसर्गिक डायमंड सोलिटेअरच्या गुणवत्ता आणि कारागिरीबाबत अधिक विश्वास मिळतो. सणासुदीचा आणि लग्नसराईचा हंगाम जवळ येत असताना, 'सोलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया २०२६'च्या विशेष ऑफर्स आणि रिवॉर्ड्सचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांकडे आता मर्यादित कालावधी शिल्लक आहे.

**टायगर ग्रुप नाशिक जिल्हा अध्यक्ष प्रशांत भाऊ काळे यांच्या वाढदिवसानिमित्ताने**

# युवकांचे युवा नेतृत्व टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष प्रशांत भाऊ काळे

**(स. गांवकरी)**

- शब्दांकन : पत्रकार अमोल माणिक सोनवणे

एक युवा नेतृत्व चेहरा सतत समाजाच्या प्रति धावून जाणारा, कुठल्याही वेळ प्रसंगी धावून जाणारा , प्रत्येकाच्या सुखा दुःखात सहभागी होणारा ... मदतीच्या वेळी स्वताहून पुढे येणारा.....आदिवासी बहुल भागातील तरुण तरुणींना शिक्षणासाठी मदत करणे त्याना शासकीय सवलती मिळून देणे त्याचे प्रश्न प्रशासना पुढे मांडणे .... आदिवासी पाड्यावर जाऊन तेथील नागरिकांना मदत करणे .....

प्रशांत भाऊ काळे यांचे समर्थक नाशिक जिल्हा पुरते नसुन अवघ्या महाराष्ट्रासह देश, विदेशात त्यांचे समर्थक आहे. पंजाब, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, तामिळनाडू , हैदराबाद, भोपाळ, वाराणसी, विशाखापट्टणम, नेपाळ , दुबई आदी देश विदेशातील प्रशांत काळे यांना कार्यक्रमासाठी समर्थक बोलवत असतात. शेकडोंच्या संख्येने त्यांचे चाहते समर्थक स्वागताला उपस्थित असतात.

साडेतीन शक्तीपीठ असलेल्या आई सप्तशृंगी मातेचा कोजागिरी पौर्णिमा उत्सव भव्य दिव्य




पध्दतीने साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर सेलिब्रिटी उपस्थित राहता. अविस्मरणीय असा सोहळा साजरा करण्यात येतो. लाखो भक्त ह्या कार्यक्रमाला उपस्थित असतात.

सामाजिक अध्यात्मिक कार्य करत असताना कुठल्याही प्रसिद्धी पासूनच ते दूरच राहिले आहे. समाजसेवा समाजासाठी धावुन जाणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रशांत राजेश काळे यांचा आज ४ सप्टेंबर २०२३ रोजी अभिष्टचिंतन त्या निमित्ताने त्यांनीं केलेल्या कार्याचा लेखा जोखा

तरुण वया पासूनच सामाजिक कार्याची आवड त्यातच आक्रमकता कोणी अंगावर आला तर त्याला शिंगावर घेण्याची ताकद आक्रमकता असल्याने शिवसेनेच्या युवा सेनेच्या माध्यमातून कामास सुरुवात केली. विधार्थी युवकांच्या विविध प्रश्नावर वाचा फोडली. मोर्चे आंदोलनात सहभाग घेतला. युवा सेनेत विधान सभा अधिकारी , युवासेना उपमहानगर प्रमुख आदी पदे घेत त्या पदास शोभेल असे काम ही केले. यानंतर सन २०१७ पासून टायगर ग्रुप चे संस्थापक तानाजी भाऊ जाधव याचे कार्य बघून त्याच्या ग्रुपचे काम चालू केले. या ग्रुप मध्ये काम करत असताना जनसेवा हीच ईश्वर सेवा मानून ज्या ठिकाणी अन्याय होत असेल त्या ठिकाणी या ग्रुपच्या माध्यमातून न्याय कसा देता येईल यासाठी आम्ही प्रयत्न करत असतो. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो ही भावना मनात ठेवून टायगर ग्रुपने ज्या ठिकाणी देशावर, राज्यात आपत्ती , जिवंत हानी, संकटे येतात तेव्हा जी काही मदत लागते ती करण्यासाठी हा समूह नेहमी पुढे असतो. अन्याय अत्याचार होत असेल त्याठिकाणी न्याय देण्यासाठी कोणताही विलंब न करता त्या व्यक्तीला न्याय कसा देता येईल. यासाठी आमचा प्रयत्न चालू असतो. टायगर ग्रुप हा समूह नेहमी सुख दुःखामध्ये एकमेकांच्या कार्यात सहभागी झाला आहे.

कोविड महामारीत टायगर ग्रुपच्या वतीने उत्तर महाराष्ट्रात अनेक उपक्रम राबविण्यात आले. गोर गरिबांना अन्न धान्य ,किराणा किट चे वाटप, अन्न दान , आरोग्य , रक्तदान शिबिरे घेण्यात आले.

रुग्णांना हॉस्पिटल ची मदत करण्यात आली. बेड उपलब्ध करून देणे, आक्सिजन पुरवठा, औषधें - इंजेक्शन उपलब्ध करुन देणे, त्याच बरोबर रुग्णाची बिले कमी करून देणे. रुग्णाला आधार देणे. त्याच प्रमाणे रक्ताचा तुटवडा जाणवू लागल्याने रक्तदान शिबिर , प्लाझ्मा दान देखील करण्यात आले. पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांच्या 'बेटी बचाव, बेटी पढाओ' या स्वनाआधारीत हातमजुरी करणाऱ्या व ज्यांना फक्त मुलीच आहेत . ज्या शिक्षणात अग्रेसर आहेत, अशा कुटुंबाचा सत्कार सन्मान सोहळा करता. गोरगरीब विद्यार्थ्यांना विशेषतः मुलींना एमपीएससी व यूपीएससी चे मोफत मार्गदर्शन उपलब्ध करून त्यातून देशाला चांगले महिला अधिकारी घडविण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

नाशिक जिल्हात 5 में 2023 रोजी टायगर ग्रुपचे भव्य दिव्य राष्ट्रीय अधिवेशन अध्यक्ष तानाजी भाऊ जाधव यांच्या उपस्थितीत दादासाहेब गायकवाड सभागृहात उपस्थित पार पडले होते. त्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मदन महाराज गोसावी,माजी खा हेमंत गोडसे, आमदार देवयानी फरांदे आदीसह शेकडो मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. सदर कार्यक्रमात ४ रुग्णवाहिका लोकार्पण करत सर्व सामान्य नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आली. व्हीलचेअर चे वाटप, दीव्यांग बांधवाना स्टिक वाटप करण्यात आले. ५ आदिवासी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च संघटना करण्यात आला. संघटना राज्यसह जिल्हा पातळीवर जोमाने काम करत असून सर्व सामान्यांना न्याय देण्याचे प्रयत्न करत आहे. प्रशांत काळे यांच्या पाठीशी शेकडो तरुणाची फळी उभी राहत आहे. आजच्या युवकांना रोजगार मिळवून देण्यासाठीकाळेकाम करत आहे. १०० टक्के संघटना सामाजिक काम करत आहे.

त्यांच्या ह्या यशामागे त्यांचे कुटुंबीय नेहमी साथ देत असते. अर्जुन व लखन असे दोन भाऊ नेहमी त्यांच्या मागे सावली सारखे उभे असतात वाढदिवसा निमित्त कुठलाही अनावश्यक खर्च नकरता सामाजिक कार्य गजरवंत गोरगरीब रुग्णाची सेवा करण्याचे आवाहन समर्थकांना प्रशांत काळे यांनी केले आहे. उत्तर महाराष्ट्त ठीक ठिकाणी सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. वृक्ष रोपण, फळे वाटप, आदिवासी पाडे येथे अन्नदान, शैक्षणिक साहित्य वाटप, रुग्णांना फळे वाटप, गाडगे महाराज धर्म शाळा ब्लेकेट वाटप , रक्तदान शिबिर आदी कार्यक्रम वाढदिवसा निमित्त मित्र मंडळी कडून करण्यात येणार आहेत.

# ४७ ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा 'आदर्श ग्रामपंचायत अधिकारी' म्हणून गुणगौरव

## ग्रामविकासातील उल्लेखनीय योगदानाची दखल; प्रशस्तीपत्रक व सन्मान पदक देऊन गौरव

ठाणे : (स. गांवकरी)

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना आणि विकासात्मक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून ग्रामपातळीवरील प्रशासन अधिक सक्षम करण्यामध्ये ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ग्रामस्थांच्या गरजा, स्थानिक समस्या आणि विकासाच्या प्राधान्यक्रमांचा विचार करून शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविणाऱ्या उत्कृष्ट ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या कार्याची दखल घेत, जिल्हा परिषद, ठाणेच्या ग्रामपंचायत विभागामार्फत 'आदर्श ग्रामपंचायत अधिकारी गुणगौरव सोहळा' उत्साहात पार पडला.




उल्लेखनीय व उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत ग्रामपंचायत विभागातील ४७ ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची 'आदर्श ग्रामपंचायत अधिकारी' म्हणून निवड करण्यात आली. या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचा त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव करण्यात आला. यावेळी त्यांना प्रशस्तीपत्रक व सन्मान पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास लोकसभा खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्यामामा), आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे आणि आमदार किसन कथोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी भूषविले. प्रारंभी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

लोकसभा खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्यामामा) यांनी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या कार्याचे कौतुक केले. शासनाच्या विविध योजना आणि लोककल्याणकारी उपक्रमांचा लाभ तळागाळातील गावांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम ग्रामपंचायत अधिकारी करीत असल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्रामस्थांच्या दैनंदिन अडचणी समजून घेऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी सातत्याने कार्यरत असतात. त्यांच्या या कामाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि उत्कृष्ट कार्याची दखल घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेला आजचा गुणगौरव सोहळा महत्त्वपूर्ण असल्याचे सांगत त्यांनी सन्मानित ४७ ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी मार्गदर्शन करताना ग्रामविकास अधिकारी हा जिल्हा परिषदेच्या विकासाचा कणा असल्याचे नमूद केले. ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रत्यक्ष गावपातळीवर काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या योगदानाचे कौतुक करत त्यांनी सन्मानित झालेल्या सर्व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. गावांच्या विकासासाठी प्रशासनाच्या विविध स्तरांमध्ये समन्वय ठेवून काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल घेणे आणि त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.


आमदार किसन कथोरे यांनी सभागृहाला संबोधित करताना गावपातळीवर विकासाची कामे पुढे नेण्यात ग्रामपंचायत अधिकारी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे सांगितले. ग्रामविकासाची कामे करताना येणाऱ्या अडचणींच्या निराकरणासाठी आपण अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सोबत असल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्रामविकासाची विविध कामे अधिक गतिमान करण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्याची ग्वाही देतानाच, ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना एक वेतनवाढ देण्यासाठी पुढील काळात प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांनी सभागृहाला संबोधित करताना ग्रामीण भागातील पात्र लाभार्थ्यांना हक्काचे, सुरक्षित आणि सन्मानाने राहता येईल असे घर मिळवून देण्यासाठी घरकुल योजनांची प्रभावी अंमलबजावणी अत्यंत महत्त्वाची आहे. जिल्ह्यात घरकुल योजनेचे कामकाज उत्कृष्टपणे राबविताना ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि घरकुलांची कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्यासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन आज करण्यात आलेला गौरव ही त्यांच्या मेहनतीला मिळालेली कौतुकाची थाप आहे. यापुढेही याच उत्साहाने, संवेदनशीलतेने आणि लोकाभिमुख दृष्टिकोनातून काम करत शासनाच्या घरकुल योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावा आणि अधिकाधिक पात्र कुटुंबांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. उत्कृष्ट कार्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) प्रमोद काळे यांनी गुणगौरव सोहळ्याच्या आयोजनापासून ते कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनापर्यंत करण्यात आलेल्या कामांचा आढावा घेतला. आदर्श ग्रामपंचायत अधिकारी म्हणून निवड झालेल्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उत्कृष्ट कार्यामुळे इतरांनाही प्रेरणा मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

# थोडक्यात पण महत्वाचे




## मोटोव्हर्स २०२६ चे काउंटडाउन सुरू

पुणे (स. गांवकरी) : सर्वात मोठा मोटो-कल्चर उत्सव 'मोटोव्हर्स २०२६'साठी सज्ज होत रॉयल एनफिल्डने आज भारतातील काही सर्वात वैशिष्ट्यपूर्ण गायक आणि कलाकारांचा समावेश असलेल्या पहिल्या टप्प्यातील कलाकारांच्या नावांची घोषणा केली आहे. रॉयल एनफिल्डच्या ऐतिहासिक १२५व्या वर्षाच्या पार्श्वभूमीवर मोटोव्हर्स २०२६ अंतर्गत २७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान तीन दिवस वागातोर, गोवा येथे संगीत, मोटरसायकल्स, कला, खेळ आणि संस्कृती अनुभवता येणार आहे. या फेस्टिव्हलचे आतापर्यंतचे सर्वात मोठे एडिशन ठरणाऱ्या मोटोव्हर्स २०२६ मध्ये विशेष मोटरसायकल्सचे अनावरण आणि लाँच, प्युअर स्पोर्ट्स अनुभव, कला व कारागिरी, क्युरेटेड राईड्स, फूड, वर्कशॉप्स आणि अनेक समुदाय अनुभव सादर केले जातील. मेन स्टेजचे प्रमुख आकर्षण ठरणाऱ्या कलाकारांमध्ये रेबल, लिफाफा, फरहान अख्तर, संजित हेगडे, एमएचआर अँड फ्रेंड्स आणि द थिंक फ्लॉयडियन यांचा समावेश आहे, जो हिप-हॉप, हिंदी-भाषिक इलेक्ट्रॉनिका, प्लेबॅक आणि ट्रिब्यूट परफॉर्मन्सचा एक अनोखा मेळ आहे. रेबल भारताच्या स्वतंत्र हिप-हॉप जगतातील ऊर्जा घेऊन येत आहे, जी आता राष्ट्रीय चित्रपटांच्या साउंडट्रॅकपर्यंत पोहोचली आहे. फरहान अख्तर रूपेरी पडदा आणि रंगमंच दोन्ही सहजपणे गाजवत आहेत. संजित हेगडे बहुभाषिक प्लेबॅक संगीताचा संग्रह घेऊन येत आहेत आणि लिफाफा हिंदी-भाषिक इलेक्ट्रॉनिका संगीतच्या कक्षा विस्तारणे सुरूच ठेवत आहे. स्टेजची सांगता करताना, एमएचआर अँड फ्रेंड्स रॅप, मेलडी आणि प्रायोगिक प्रॉडक्शनचा एक अनोखा संच सादर करत आहेत, तर द थिंक फ्लॉयडियन पिंक फ्लॉयडचा वातावरणीय आणि तल्लीन करणारा लाईव्ह आवाज पुन्हा निर्माण करत स्वतःचा एक सायकेडेलिक सेट सादर करत आहेत. हे सर्व कलाकार एकत्र येऊन मोटोव्हर्सची ओळख बनलेली विविधता आणि व्यापकता दर्शवतात.

## हायब इंडिया परतले हायब इंडिया ऑडिशन




पुणे (स. गांवकरी) : हायब इंडिया ने आज हायब इंडिया ऑडिशनः फायनल कॉल ची घोषणा केली असून, पहिल्या फेरीतील ऑडिशनला मिळालेल्या जबरदस्त प्रतिसादानंतर पुढील पिढीतील भारतीय टॅलेंट शोधण्यासाठी हा उपक्रम विस्तारला जात आहे. हायब इंडिया ऑडिशनला आधीच भारतभरातून अर्ज आले आहेत, ज्यामध्ये 28 राज्ये आणि 6 केंद्रशासित प्रदेशांचा सहभाग आहे. तसेच जागतिक भारतीय डायस्पोराकडूनही मोठ्या प्रमाणात सहभाग मिळाला आहे. 116 देशांतील 1,650 हून अधिक शहरांमधून अर्ज प्राप्त झाले आहेत, ज्यातून हायब च्या जागतिक आर्टिस्ट डेव्हलपमेंट इकोसिस्टममध्ये सामील होण्याची संधी मिळवण्याची उत्सुकता आणि व्यापक रस दिसून येतो. फायनल कॉल हा हायब इंडिया चा विश्वास दर्शवतो की टॅलेंट कुठेही सापडू शकतो. आता हा शोध देशभरातील शहरांमध्ये, गावांमध्ये आणि समुदायांमध्ये अधिक खोलवर जाईल, जिथे तरुण मुली मोठी स्वप्ने पाहत आहेत, आपला आवाज विकसित करत आहेत आणि स्वतःला व्यक्त करण्याचे नवे मार्ग शोधत आहेत. देशभरात ऑडिशनचा विस्तार करून हायब इंडिया अधिकाधिक कलाकारांना पाहिले जाण्याची, ऐकले जाण्याची आणि संधी मिळण्याची संधी देत आहे, ज्यामुळे त्यांना जागतिक मंचावर पहिले पाऊल टाकता येईल.

## लेक्सस इंडियाने भारतात लॉन्च केली ऑल-न्यू ES 350h




मुंबई (स. गांवकरी) : लेक्सस इंडियाने भारतात ऑल-न्यू ES 350h ही आठव्या पिढीतील एक्झिक्युटिव्ह सेडान लॉन्च केली आहे. सेल्फ-चार्जिंग हायब्रिड इलेक्ट्रिक पॉवरट्रेनसह सादर करण्यात आलेली ही कार लेक्ससच्या इलेक्ट्रिफाइड वाहनांच्या श्रेणीतील महत्त्वाची भर आहे. कार्बन-न्यूट्रल भविष्यासाठीच्या कंपनीच्या 'मल्टी-पाथवे' दृष्टिकोनाशी ही कार सुसंगत असल्याचे कंपनीने म्हटले आहे. ऑल-न्यू ES 350h भारतातच तयार करण्यात आली असून, तिच्यामध्ये लेक्ससची प्रगत तंत्रज्ञान, आराम आणि लक्झरी यांची सांगड घालण्यात आली आहे. या मॉडेलची रचना 'Discover Confidence' या संकल्पनेवर आधारित असून, लांब पल्ल्याच्या प्रवासातील आरामासोबतच अधिक ड्रायव्हिंग आत्मविश्वास आणि नियंत्रण देण्यावर भर देण्यात आला आहे.

## सोनालिकाची ऑगस्टमध्ये विक्रमी १२,५८१ ट्रॅक्टर विक्री



पुणे (स. गांवकरी) : भारतातील आघाडीच्या ट्रॅक्टर निर्यात ब्रँडपैकी एक असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने आर्थिक वर्ष २०२७मध्ये दमदार कामगिरी कायम ठेवत ऑगस्ट २०२६मध्ये १२,५८१ ट्रॅक्टरची विक्रमी विक्री नोंदवली आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, ऑगस्टमधील ही कामगिरी एकूण ट्रॅक्टर उद्योगाच्या वाढीच्या तुलनेत १.९ पट अधिक आहे. कंपनीच्या ३०व्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठण्यात आला आहे. पंजाबमधील होशियारपूर येथील सोनालिकाच्या ट्रॅक्टर उत्पादन प्रकल्पात ऑगस्टमध्ये १८,०६७ ट्रॅक्टरचे आतापर्यंतचे सर्वोच्च मासिक उत्पादन नोंदविण्यात आले.

# एआय+चा 'नेक्स्ट क्वांटम ओएस १.१'सादर

## डेटा सुरक्षा आणि वापरकर्त्यांच्या गोपनीयतेवर अधिक भर

महाराष्ट्र : (स. गांवकरी)

एआय+ स्मार्टफोनने 'नेक्स्ट क्वांटम ओएस'ची आवृत्ती १.१ सादर केली असून, या नव्या आवृत्तीत गोपनीयता संरक्षणाची चौकट अधिक मजबूत करण्यात आली आहे. तसेच, ॲप्लिकेशन्सना वापरकर्त्यांच्या उपकरणांवरील संसाधने आणि डेटाचा वापर कसा करता येतो, याबाबत अधिक पारदर्शकता आणि नियंत्रण वापरकर्त्यांना मिळणार आहे. डेटा सार्वभौमत्व आणि सुरक्षिततेच्या बांधिलकीचा भाग म्हणून 'नेक्स्ट क्वांटम'मध्ये कठोर 'सॉव्हरिन डेटा बाउंड्री' लागू करण्यात आली आहे. त्यामुळे ॲप्लिकेशन्समधून होणारी १०० टक्के डेटा वाहतूक भारतातच उपलब्ध असलेल्या आणि भारतात होस्ट केलेल्या पायाभूत सुविधांमधून केली जाते. परिमिती सुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी या प्रणालीद्वारे १,००० हून अधिक कनेक्शन्स आणि १७२ स्वतंत्र गंतव्य आयपींच्या सोर्स नियमांचे स्वयंचलित विश्लेषण केले जाते. विशेष म्हणजे, सर्व डेटा वाहतूक आणि आयपी पिंग्ज भारताच्या हद्दीतच मर्यादित राहतात. केवळ ऑपरेटिंग सिस्टमच्या आवश्यक मूलभूत कार्यांसाठी आवश्यक असलेली गुगलची काही कोअर सेवा कॅलिफोर्निया आणि सिंगापूरकडे निर्देशित केली जाते. या माध्यमातून डेटा अखंडतेला प्राधान्य देतानाच 'नेक्स्ट क्वांटम ओएस'च्या चौकटीशी सुसंगतपणे वापरकर्त्यांच्या माहितीचे संरक्षण करण्याच्या बांधिलकीला अधिक बळकटी दिली जाते.




- भारतातच मूलभूत डेटा पायाभूत सुविधा आणि सोर्स कोडची देखभाल

# किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरीचे पुण्यात १०वे एक्सक्लुझिव्ह शोरूम

## हडपसरच्या इमेनोरा मॉलमध्ये दिमाखदार उद्घाटन; ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्ससह मेगा लकी ड्रॉ

पुणे : (स. गांवकरी)

किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरीने पुण्यातील हडपसर येथील इमेनोरा मॉलमध्ये महाराष्ट्रातील आपल्या १०व्या एक्सक्लुझिव्ह शोरूमचे उद्घाटन केले. या प्रसंगी हरी कृष्णा ग्रुपचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक घनश्याम ढोलकिया उपस्थित होते. या नव्या शोरूमच्या माध्यमातून पुणे आणि परिसरातील ग्राहकांना दर्जेदार हिरे व सोन्याचे दागिने, आधुनिक डिझाइन्स आणि प्रीमियम खरेदीचा अनुभव उपलब्ध करून देण्याचा ब्रँडचा उद्देश आहे. शोरूमच्या उद्घाटनानिमित्त ग्राहकांसाठी विविध आकर्षक ऑफर्स जाहीर करण्यात आल्या आहेत. डायमंड ज्वेलरीच्या घडणावळीच्या शुल्कावर १०० टक्क्यांपर्यंत, तर गोल्ड ज्वेलरीच्या घडणावळीच्या शुल्कावर ५० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येणार आहे.



तसेच जुन्या सोन्याच्या एक्सचेंजवर डायमंड ज्वेलरीच्या खरेदीसाठी १०५ टक्क्यांपर्यंत मूल्य मिळण्याची संधी ग्राहकांना देण्यात आली आहे.

याशिवाय डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात होणाऱ्या मेगा लकी ड्रॉमध्ये ग्राहकांना तीन स्कूटर आणि एका कारचे बक्षीस जिंकण्याची संधी मिळणार आहे. हरी कृष्णा ग्रुपचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक घनश्याम ढोलकिया म्हणाले, "पुणे हे किसनासाठी महत्त्वाचे आणि वेगाने विकसित होणारे बाजारपेठ आहे. महाराष्ट्रातील आमच्या १०व्या एक्सक्लुझिव्ह शोरूमचे उद्घाटन हा आमच्या विस्तार धोरणातील महत्त्वाचा टप्पा आहे. देशातील विविध शहरांमधील ग्राहकांना विश्वासार्ह, दर्जेदार आणि आधुनिक हिऱ्यांचे दागिने सहज उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. 'हर घर किसना' या संकल्पनेतून अधिकाधिक भारतीय कुटुंबांपर्यंत हिऱ्यांचे दागिने पोहोचविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत." पुण्यातील नव्या शोरूममध्ये ग्राहकांच्या बदलत्या आवडी-निवडी आणि आधुनिक जीवनशैलीचा विचार करून हिरे आणि सोन्याच्या दागिन्यांचा विविधांगी संग्रह उपलब्ध करून देण्यात आला आहे. दैनंदिन वापरापासून ते लग्नसमारंभ, सण आणि विशेष प्रसंगांसाठी विविध डिझाइन्स ग्राहकांना येथे पाहता येणार आहेत. किसनाच्या फ्रँचायझी भागीदार ध्रुवी रोहित भाटिया आणि वैशाली सुनील खंडेलवाल म्हणाल्या, "किसनासारख्या प्रतिष्ठित ब्रँडशी जोडले जाणे आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. गुणवत्ता, उत्कृष्ट कारागिरी, आधुनिक डिझाइन्स आणि ग्राहकांचा विश्वास यामुळे किसनाने दागिन्यांच्या क्षेत्रात आपले भक्कम स्थान निर्माण केले आहे. पुणे आणि परिसरातील ग्राहकांना प्रीमियम आणि विश्वासार्ह खरेदीचा अनुभव देण्याचा आमचा प्रयत्न असेल."

# स्पर्धा स्कूल आयडॉल सीजन २ च्या अंतिम फेरीत पुण्यातील असामान्य तरुण प्रतिभांचे प्रदर्शन

पुणे : (स. गांवकरी)

स्पर्धा स्कूल ऑफ म्यूझिकने स्पर्धा स्कूल आयडॉल सीजन २ च्या अंतिम फेरीचे पुण्यातील कुमार पॅसिपिक मॉलमध्ये यशस्वी आयोजन केले. यामध्ये वाद्यवादन, गायन आणि नृत्य या तीन प्रकारांतील होतकरू कलावंतांची प्रतिभा, समर्पण आणि ध्यास जल्लोषात साजरा करण्यात आला. स्पर्धेच्या आरंभीच्या फेऱ्यांमध्ये यशस्वी झालेले स्पर्धक या अंतिम फेरीत एकत्र आले होते. यातील प्रत्येक स्पर्धकाने पालक, संगीत रसिक आणि पाहुण्यांचा समावेश असलेल्या उत्साही प्रेक्षकांसमोर मोहक सादरीकरण केले. या कार्यक्रमाने तरुण कलाकारांना त्यांचे कौशल्य दाखवण्यासाठी एक व्यावसायिक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. तसेच, त्यांना रंगमंचावरील मौल्यवान अनुभव आणि आत्मविश्वास प्राप्त करण्याची संधी मिळाली. यावेळी सहभागींची सर्जनशीलता, तांत्रिक उत्कृष्टता आणि स्टेजवरील उपस्थितीने




परीक्षक प्रभावित झाले. त्यामुळे स्पर्धा रोमांचक आणि अटीतटीची झाली. विद्यार्थ्यांची कटिबद्धता आणि त्यांचे कुटुंब व मार्गदर्शकांचे प्रोत्साहन यांचे प्रतिबिंब या सादरीकरणात पडले.

युवा प्रतिभांना प्रोत्साहन देण्याच्या कटिबद्धतेचा एक भाग म्हणून, स्पर्धा स्कूल ऑफ म्युझिकने विजेत्यांसाठी विशेष बक्षिसे आणि संधींची घोषणा केली.

स्पर्धा स्कूल आयडॉल सीझन २च्या विजेत्यांना रोख बक्षिसे, शिष्यवृत्ती, ट्रॉफी आणि संधींनी सन्मानित करण्यात आले जेणेकरून त्यांच्या निरंतर कलात्मक विकासास प्रोत्साहन मिळावे. प्रथम पारितोषिक विजेता - रोख ६००० रुपये बक्षीस, 'स्पर्धा' अभ्यासक्रमांसाठी ३० टक्के शिष्यवृत्ती (अटी व शर्ती लागू), ट्रॉफी, रेडिओ मिर्ची स्टुडिओला भेट देणे, विजेत्या सादरीकरणाचे

रेडिओ मिर्ची (केवळ गायन आणि वाद्ये) वर प्रसारण आणि 'स्पर्धा'च्या ऑनलाइन हॉल ऑफ फेममध्ये उल्लेख. द्वितीय पारितोषिक विजेता – रोख ४००० रुपये बक्षीस, स्पर्धा अभ्यासक्रमांसाठी २५ टक्के शिष्यवृत्ती (अटी व शर्ती लागू), ट्रॉफी आणि 'स्पर्धा' ऑनलाइन हॉल ऑफ फेममध्ये उल्लेख. तृतीय पारितोषिक विजेते – रोख २००० रुपये बक्षीस, 'स्पर्धा' अभ्यासक्रमांसाठी २५ टक्के शिष्यवृत्ती (अटी व शर्ती लागू), ट्रॉफी आणि 'स्पर्धा' ऑनलाइन हॉल ऑफ फेममध्ये उल्लेख. याप्रसंगी बोलताना 'स्पर्धा स्कूल ऑफ म्युझिक'चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सौरभ श्रीवास्तव म्हणाले, "तरुण कलाकारांना निकोप स्पर्धेद्वारे शिकण्याची, कला सादर करण्याची आणि वाढण्याची संधी उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. यंदाच्या अंतिम फेरीतील उल्लेखनीय सादरीकरण हे प्रत्येक स्पर्धकाच्या मेहनत, शिस्त आणि उत्कटतेचा दाखला आहे. आम्ही सर्व अंतिम स्पर्धकांचे अभिनंदन करतो आणि हा कार्यक्रम यशस्वी करणाऱ्या पालक, मार्गदर्शक आणि समर्थकांचे आभार मानतो."

# आयफॅट इंडिया २०२६ मध्ये ३० हून अधिक देशांचा सहभाग

पुणे : (स. गांवकरी)

भारतात जलसुरक्षा, सांडपाणी प्रक्रिया, घनकचरा व्यवस्थापन आणि संसाधन पुनर्प्राप्ती क्षेत्रातील गुंतवणुकीला वेग येत असताना, या क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि उपाययोजनांचे प्रदर्शन करणारा आयफॅट इंडिया २०२६ मुंबईत आयोजित करण्यात येणार आहे. ९ ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे होणाऱ्या या तीन दिवसीय व्यापार मेळाव्यात ३० हून अधिक देशांमधून सुमारे ५०० प्रदर्शक सहभागी होणार आहेत. मेस्से म्युनिख इंडिया यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या मेळाव्यात पर्यावरण तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या, धोरणकर्ते, सरकारी आणि महानगरपालिका अधिकारी, उद्योग प्रतिनिधी तसेच प्रकल्प विकासक सहभागी होणार आहेत. या आयोजनाला २५ हजारांहून अधिक अभ्यागत भेट



देण्याची अपेक्षा आहे.

मेस्से म्युनिख इंडिया आणि आयएमईएचे अध्यक्ष तसेच मेस्से म्युनिख इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी भूपेंद्र सिंह म्हणाले, "भारताचे पर्यावरणीय पायाभूत सुविधा क्षेत्र आता केवळ क्षमता वाढविण्याच्या टप्प्यापुढे गेले असून, मोठ्या प्रमाणावर प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे. शहरे आणि उद्योग कार्यक्षमता वाढविणारी, संसाधनांचा पुनर्वापर शक्य करणारी आणि दीर्घकाळ विश्वासार्ह कामगिरी देणारी तंत्रज्ञाने शोधत आहेत."



# रायरेश्वर येथे शिक्षकांचा सन्मान, शैक्षणिक साहित्य वाटप आणि वृक्षारोपण

पुणे : (स. गांवकरी)

डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप, पुणे संचालित ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी (DPGU)च्या वतीने प्र-कुलपती डॉ. सोमनाथ पी. पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रायरेश्वर येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शिक्षणाला प्रोत्साहन देणे, दुर्गम भागातील शिक्षकांच्या योगदानाचा सन्मान करणे आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणे हा या उपक्रमामागील उद्देश होता. डीपीजीयूच्या टीमने रायरेश्वर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देऊन दुर्गम डोंगराळ भागात विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या शिक्षकांचा सन्मान केला. शिक्षकांच्या शैक्षणिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांना पुस्तके, तर विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देण्याच्या विद्यापीठाच्या सामाजिक बांधिलकीचा हा उपक्रम असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्ट्सचा आईस्क्रीम बाजारात प्रवेश

- 'बॉम्बे क्रीमरी' ब्रँड लाँच
- अस्सल दुग्धजन्य घटकांपासून तयार आइस्क्रीम परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध करण्याचा दावा

पुणे : (स. गांवकरी)

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या दैनंदिन वापरातील ग्राहक उत्पादन विभागातील कंपनी रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेडने 'बॉम्बे क्रीमरी' या नव्या ब्रँडच्या माध्यमातून देशातील वेगाने वाढणाऱ्या आईस्क्रीम बाजारपेठेत धोरणात्मक प्रवेश केला आहे. देशव्यापी वितरण व्यवस्था, व्यापक किरकोळ पोहोच आणि ग्राहकांच्या पसंती-गरजांचे आकलन याच्या बळावर कंपनीने या




क्षेत्रात दीर्घकालीन विस्ताराची तयारी केली आहे. 'बॉम्बे क्रीमरी'ची उभारणी अस्सल दुग्धजन्य घटक आणि गुणवत्तेला प्राधान्य देण्याच्या उद्देशाने करण्यात आली आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, ब्रँडची आइस्क्रीम अस्सल दुधाच्या सायीपासून तयार केली जाते. 'परवडणाऱ्या किमतीत जागतिक दर्जाची गुणवत्ता' या रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्ट्सच्या भूमिकेशी सुसंगत राहून ग्राहकांना दर्जेदार आइस्क्रीमचा अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेडचे संचालक टी. कृष्णकुमार म्हणाले, "दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड किंवा शॉर्टकट स्वीकारता कामा नये, या विचारातून बॉम्बे क्रीमरीची निर्मिती करण्यात आली आहे. आम्ही केवळ आइस्क्रीम बाजारात प्रवेश करत नसून, या क्षेत्रासाठी दीर्घकालीन बांधिलकी घेऊन पुढे जात आहोत. अस्सल दुधाच्या सायीपासून तयार केलेली बॉम्बे क्रीमरी ग्राहकांना खऱ्या आइस्क्रीमची चव आणि अनुभव देण्यासोबतच भारतीय कुटुंबांना परवडेल अशा किमतीत उपलब्ध होईल." बॉम्बे क्रीमरीच्या उत्पादन श्रेणीमध्ये ग्राहकांच्या आवडीनुसार विविध प्रकारच्या आइस्क्रीमचा समावेश करण्यात आला आहे. कोन, कप, डबे, बार आणि स्टिक अशा लोकप्रिय प्रकारांमध्ये ही उत्पादने उपलब्ध होणार आहेत. या ब्रँडची उपलब्धता सुरुवातीला पश्चिम भारतातील बाजारपेठेत करण्यात येत आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने देशातील इतर भागांमध्येही बॉम्बे क्रीमरीची उत्पादने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# पडघा बस स्थानक परिसरातील धोकादायक झाडाची जबाबदारी नेमकी कुणाची?

## झाडाच्या निष्कासनावरून ग्रामपंचायत-वनविभाग आमनेसामने; दोन्ही विभागांकडून एकमेकांकडे बोट

भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील पडघा बस स्थानक परिसरातील धोकादायक व जीर्ण अवस्थेतील झाडाच्या निष्कासनावरून पडघा ग्रामपंचायत आणि पडघा वनपरिक्षेत्र विभाग यांच्यात जबाबदारी ढकलण्याचा प्रकार सुरू असल्याचे चित्र आहे. त्यामुळे धोकादायक झाडाचा प्रश्न अद्यापही कायम असून, एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पडघा बस स्थानकाला लागून असलेल्या वनविभागाच्या डेपोच्या



कंपाऊंडमध्ये रेन ट्री जातीचे एक झाड जीर्ण व धोकादायक अवस्थेत आहे. या झाडामुळे प्रवासी, विद्यार्थी, नागरिक तसेच वाहनचालकांच्या सुरक्षेला धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पडघा पोलीस ठाण्याच्या माध्यमातून पडघा ग्रामपंचायत आणि पडघा वनपरिक्षेत्र कार्यालयाला लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र, यानंतर झाडाच्या निष्कासनाची जबाबदारी नेमकी कोणाची, यावरून दोन्ही विभागांकडून एकमेकांकडे बोट दाखविले जात असल्याचे समोर आले आहे. वनविभागाचा दावा पडघा वनपरिक्षेत्र कार्यालयाने दिलेल्या पत्रात, सदरची बाब पडघा वनपरिक्षेत्राच्या कार्यक्षेत्रात येत नसल्याचे नमूद करून याबाबत ग्रामपंचायत पडघा यांच्याशी संपर्क साधावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.पडघा ग्रामपंचायतीचा दावा दुसरीकडे, सदर धोकादायक वृक्ष हा पडघा वनविभागाच्या डेपोच्या कंपाऊंडच्या आत असल्याचे ग्रामपंचायतीकडून सांगण्यात आले आहे. ग्रामपंचायतीच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन झाडाची पाहणी केली असून, कंपाऊंड वनविभागाच्या ताब्यात असल्याने सदर धोकादायक झाडाच्या निष्कासनाची जबाबदारी पडघा वनविभागाची असल्याचे ग्रामपंचायतीच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे. पडघा बस स्थानक परिसरात दररोज विद्यार्थी, प्रवासी, नागरिक आणि वाहनांची मोठी वर्दळ असते. अशा संवेदनशील ठिकाणी जीर्ण अवस्थेतील झाड कोसळल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे 'झाड कुणाच्या हद्दीत आहे?' यापेक्षा 'नागरिकांची सुरक्षा कुणाची जबाबदारी?' हा प्रश्न महत्त्वाचा ठरत आहे. दोन्ही विभागांनी एकमेकांकडे जबाबदारी ढकलण्याऐवजी तातडीने संयुक्त पाहणी करून धोकादायक झाडाबाबत योग्य निर्णय घ्यावा आणि संभाव्य दुर्घटना टाळावी, अशी चर्चा पडघा परिसरातील नागरिकांकडून होत आहे.



ठाणे : ठाणे महापालिका आयुक्तांच्या दिवा शहरातील प्रस्तावित दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर दिवा प्रभाग समितीच्या अतिक्रमण विभागाने गुरुवारी धडक कारवाई करत शहरातील विविध ठिकाणचे बेकायदेशीर गाळे, टपऱ्या आणि अतिक्रमणे हटवली. या कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दिवा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात सुमारे १० ते १५ बेकायदेशीर गाळ्यांवर कारवाई करून ते जमीनदोस्त करण्यात आले. तसेच स्टेशन रोडवरील अनेक अनधिकृत गाळे व टपऱ्यांवरही कारवाई करण्यात आली.

## थोडक्यात बातम्या...



### मराठा आरक्षणासाठी तामसा कडकडीत बंद!

तामसा (स. गांवकरी) : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरु असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आज तामसा शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. सकाळपासूनच शहरातील बाजारपेठ, दुकाने आणि प्रमुख व्यावसायिक आस्थापना बंद ठेवून व्यापारी व नागरिकांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. सकाल मराठा समाजाच्या वतीने गुरुवारी तामसा बंदचे आवाहन केले होते. स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडचे माधवराव पाटील देवसरकर यांच्या नेतृत्वाखाली तामसा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांना निवेदन दिले. यावेळी तालुका अध्यक्ष मारोती पाटील वडगावकर, कृषी व्यापारी संघाचे उपाध्यक्ष गजानन पाटील शिंदे, अमोल वानखेडे, बालाजी कोल्हे,सह मोठ्या संख्येने मराठा समाज उपस्थित होता. त्या आवाहनाला साथ देत व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठाने दिवसभर कडकडीत बंद ठेवले होते. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारने ठोस निर्णय घेऊन मागण्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केली. आरक्षणावर शासनाने त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आली. मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ तामसातील बंद शांततेत पार पडला असून, शहरात आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



### स्वारातीम विद्यापीठ कार्यक्षेत्राचा राज्यस्तरावर गौरव

■ विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर दादाजी पवार यांची शिक्षक संवर्गातून निवड

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार' स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील मान्यवरांना जाहीर झाला आहे. सन २०२४-२५ या वर्षाकरिता शिक्षक संवर्गातून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर दादाजी पवार यांना हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच सन २०२५-२६ या वर्षाकरिता प्राचार्य संवर्गातून राजर्षी शाहू महाराज महाविद्यालय, लातूरचे प्राचार्य तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. महादेव हरिदास गव्हाणे यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. शिक्षक संवर्गातून स्वारातीम विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व सहकार्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश जयंतीलाल वाढेर आणि दयानंद कला महाविद्यालय, लातूरच्या डॉ. अंजली बालमुकुंद जोशी यांना हा पुरस्कार विभागून जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे स्वरूप २५ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानपत्र असे आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सर्व पुरस्कारप्राप्तांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



### अक्कलकोट तालुक्यातील तोळणुर केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात संपन्न

अक्कलकोट (स. गांवकरी) : अक्कलकोट तालुक्यातील तोळणूर केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात संपन्न झाली. श्री सिद्धारमेश्वर प्रशाला, तोळणूर येथे तोळणूर केंद्राची शिक्षण परिषद उत्साहपूर्ण व शैक्षणिक वातावरणात नुकतीच संपन्न झाली. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रशालेचे ज्येष्ठ शिक्षक श्री. प्रकाश अतनूर सर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. शिक्षण परिषदेस केंद्रप्रमुख श्री. लक्ष्मीकांत तळवार सर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी श्री. लक्ष्मीकांत तळवार सर, श्री. प्रकाश अतनूर सर व श्री. राजकुमार काळे सर यांनी उपस्थित शिक्षकांना विविध शैक्षणिक विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी PGI (परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स), डॉ. जयंत नारळीकर गणित व विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम, नवीन अभ्यासक्रम प्रशिक्षण, SCERT पुणे यांनी दिलेल्या शिक्षण परिषद मार्गदर्शिकेनुसार शैक्षणिक उपक्रम तसेच लोकसंख्या शिक्षण स्पर्धा (लोकनृत्य व भूमिका अभिनय) या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आपल्या स्तरावरील विविध विषयांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबतही चर्चा करण्यात आली. कार्यक्रमास जि. प. प्राथमिक कन्नड शाळेचे मुख्याध्यापक श्री. सोमनाथ महामुनी सर, श्री. दिनेश चव्हाण सर, तोळणूर प्रशालेचे ज्येष्ठ शिक्षक श्री. प्रकाश अतनूर सर, माणकोजी मॅडम, श्री. विठ्ठल पवार सर तसेच केंद्रातील बहुसंख्य शिक्षक उपस्थित होते.

# पुण्यात एडीपी इंडियाचा वार्षिक दिन सोहळा उत्साहात साजरा

पुणे : (स. गांवकरी)




मानवी भांडवल व्यवस्थापन उपाययोजनांमधील आघाडीची संस्था एडीपी प्रायव्हेट लिमिटेड ने पुण्यातील जेडब्लू मॅरीयट येथे १,३५० हून अधिक कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत आपला वार्षिक दिन सोहळा साजरा केला. 'आमचे नवे युग: मानवी नेतृत्व, कृत्रिम बुद्धिमत्तेची साथ' या संकल्पनेखाली आयोजित या सोहळ्यात भारतातील एडीपी च्या २७ वर्षांच्या प्रवासाचा गौरव करण्यात आला. तसेच, संस्थेच्या सातत्यपूर्ण विकास आणि परिवर्तनाला चालना देणारे कर्मचारी, कल्पना आणि संस्कृती यावर प्रकाश टाकण्यात आला. पुण्यातील वार्षिक दिन सोहळ्याने एडीपी इंडिया च्या कर्मचारी-केंद्रित संस्कृतीचे दर्शन घडवतानाच, उल्लेखनीय कामगिरीची दखल घेणे, प्रतिभेचा गौरव करणे आणि कर्मचाऱ्यांना एकत्र आणण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. कार्यक्रमात एडीपी इंडिया च्या कर्मचाऱ्यांसह कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व विभाग तरंगच्या माध्यमातून सहाय्य मिळणाऱ्या मुलांनी विविध सांस्कृतिक सादरीकरणे केली. या माध्यमातून एडीपी समुदायातील विविध पिढ्या एकाच मंचावर आल्या. एडीपी स्टुडिओ च्या उत्साहपूर्ण संगीत सादरीकरणांसह नाट्यप्रयोग आणि दमदार ढोलवादनाने सोहळ्याची रंगत वाढवली. या प्रसंगी बोलताना एडीपी प्रायव्हेट लिमिटेड चे व्यवस्थापकीय संचालक आणि सरव्यवस्थापक, श्री. विजय वेमुलापल्ली म्हणाले, "एडीपी इंडिया च्या उल्लेखनीय प्रवासाला आकार देणाऱ्या आणि संस्थेचे भविष्य घडवत राहणाऱ्या आमच्या कर्मचाऱ्यांचा गौरव करण्याची संधी म्हणजे वार्षिक दिन. २७ वर्षांच्या कालावधीत आम्ही १०२ कर्मचाऱ्यांपासून १३,६०० हून अधिक कर्मचाऱ्यांपर्यंतचा प्रवास केला असून, आज आम्ही नवोन्मेष आणि उच्च-मूल्याच्या कामासाठी एक धोरणात्मक केंद्र म्हणून विकसित झालो आहोत. 'मानवी नेतृत्व, कृत्रिम बुद्धिमत्तेची साथ' या नव्या युगात प्रवेश करत असताना, आमचे कर्मचारी आम्ही करत असलेल्या प्रत्येक गोष्टीच्या केंद्रस्थानी आहेत. मानवी क्षमतेला अधिक सक्षम करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यावर आमचा भर आहे. त्याचबरोबर, कामाच्या भविष्याला आकार देणारी कौशल्ये, सर्जनशीलता आणि नेतृत्व यामध्ये आम्ही सातत्याने गुंतवणूक करत राहू." मानवी भांडवल व्यवस्थापन उद्योग सध्या परिवर्तनाच्या नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे.

संस्था मानवी संसाधने, वेतन व्यवस्थापन, मनुष्यबळ व्यवस्थापन, प्रतिभा आणि विश्लेषण यांसारख्या क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर करत आहेत. १४० हून अधिक देशांमधील ११ लाखांहून अधिक ग्राहकांना सेवा देणारी एडीपी वेतन व्यवस्थापन, मनुष्यबळ व्यवस्थापन, प्रतिभा, विश्लेषण आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित मानव संसाधन उपाययोजनांमधील आपल्या एकात्मिक कौशल्याच्या माध्यमातून संस्थांना कामाच्या बदलत्या जगाशी जुळवून घेण्यास मदत करत आहे.

# रिअल इस्टेट ब्रँड जमतानीचा ब्रँड ॲम्बेसेडर रणवीर सिंग

पुणे : (स. गांवकरी)



पुण्यातील रिअल इस्टेट क्षेत्रातील जमतानी समूहाने लोकप्रिय अभिनेता रणवीर सिंग याची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. 'The Name is a Promise – नाव म्हणजे एक वचन' या तत्त्वज्ञानावर उभ्या असलेल्या जमतानीच्या नव्या पर्वाची सुरुवात या भागीदारीतून करण्यात आली. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत या भागीदारीची अधिकृत घोषणा करण्यात आली. गेल्या १६ वर्षांतील जमतानीच्या प्रवासात वेळेत प्रकल्प पूर्ण करणे, दर्जेदार बांधकाम, विश्वासार्हता आणि ग्राहकांशी दीर्घकालीन संबंध या मूल्यांना महत्त्व देण्यात आले आहे. या मूल्यांमुळे पुण्यातील १३ हजारांहून अधिक ग्राहकांचा विश्वास संपादन केल्याचा कंपनीचा दावा आहे. रणवीर सिंगची ऊर्जा, महत्त्वाकांक्षा, सातत्याने स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याची वृत्ती आणि पारंपरिक चौकटी मोडून नवे प्रयोग करण्याची शैली जमतानीच्या नव्या वाटचालीशी सुसंगत असल्याचे कंपनीने म्हटले आहे. या भागीदारीबद्दल बोलताना रणवीर सिंग म्हणाला, "कोणतीही मजबूत भागीदारी समान मूल्ये आणि भविष्यासाठीच्या समान दृष्टिकोनातून निर्माण होते. जमतानीसोबतची ही भागीदारी माझ्यासाठी त्यामुळेच विशेष आहे. दर्जा आणि विश्वासाच्या जोरावर या ब्रँडने एक मजबूत वारसा निर्माण केला आहे आणि त्याच्या पुढील प्रवासाचा भाग होताना मला अभिमान वाटतो."



# 'मेगा प्लेसमेंट ड्राइव्ह'ला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

पुणे : (स. गांवकरी)

पुणे विद्यार्थी गृहाचे (पीव्हीजी) कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स आणि मॅजिक बस फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'वॉक-इन मेगा प्लेसमेंट ड्राइव्ह २०२६'ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या रोजगार मेळाव्यात सहभागी २४ कंपन्यांपैकी २१ कंपन्यांनी प्रत्यक्ष महाविद्यालयात, तर तीन कंपन्यांनी ऑनलाइन माध्यमातून निवड प्रक्रिया राबवली. महाविद्यालयातील जवळपास ३९० विद्यार्थ्यांनी या निवड प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदवला. बँकिंग, वित्तीय सेवा, माहिती तंत्रज्ञान, आयटीईएस, बीपीओ, सायबर सुरक्षा, डिजिटल मार्केटिंग, अनिमेशन, एआय, मशीन लर्निंग, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, वित्त व लेखा अशा विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या. ॲक्सिस बँक, श्रीराम फायनान्स, लोकमान्य मल्टीपर्पज बँक, निनाद वेबटेक, एबी इन्फोटेक सोल्यूशन्स, डॉक्टर रेड्डीज फाऊंडेशन, कस्टर्ड ॲपल अनिमेशन, निनाद वेबटेक, सिद्धेश कम्युनिकेशन्स यांसह विविध नामांकित कंपन्यांचा समावेश होता. पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड, आयक्वॅकच्या समन्वयिका डॉ. स्वाती जोशी, अधिष्ठाता प्रा. महादेव पिसाळ, संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रियांका खुटवड, वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. शीतल सुकटे, ॲनिमेशन विभागप्रमुख सिद्धांत खंडागळे, सायबर सुरक्षा विभागप्रमुख डॉ. शिवाजी गोडावळे, प्रशिक्षण व नियुक्ती अधिकारी प्रशांत देशमुख, मॅजिक बस फाउंडेशनच्या संपदा तिडके, नियुक्ती अधिकारी गिरीश कोरपे आणि किरण मोरे यांच्यासह विविध कंपन्यांचे संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मानव संसाधन विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# काशिनाथ अनप्पा कोडते यांचे दुःखद निधन

अक्कलकोट : (स. गांवकरी)



अक्कलकोट तालुक्यातील कलकर्जाळ गावचे सरपंच आणि माजी जिल्हा परिषद व माजी पंचायत समिती सदस्य आणि श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याचे संचालक काशीनाथ अनप्पा कोडते यांचे २ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ८ वाजता वयाच्या ७५ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना नातवंडे, असा फार मोठा परिवार आहे. युवा शिवसेनेचे अक्कलकोट तालुका प्रमुख समीर ई.शेख, सिद्धाराम श्री कोळी ( उपसरपंच) मैनोद्दीन नि बिराजदार व ग्रामपंचायत कलकर्जाळ समस्त ग्रामस्थ कलकर्जाळ यांनी कोडते यांच्या निधनाबद्धल दुःख व्यक्त केले आहेत. काशिनाथ कोडते यांच्या पार्थिवावर हजारोच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# पुण्यातून 'डेंग्यूमुक्त भारत' अभियानाला सुरुवात

पुणे : (स. गांवकरी)



भारतातील क्रमांक एक वैयक्तिक वापरासाठीचे डास प्रतिबंधक उत्पादन असलेल्या ओडोमॉसने 'डेंग्यूमुक्त भारत' या देशव्यापी जनजागृती अभियानाची सुरुवात केली. नागरिकांमध्ये डेंग्यूपासून बचावाबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच दिवसा डेंग्यूचा प्रसार करणाऱ्या डासांपासून संरक्षण घेण्याची गरज अधोरेखित करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. शाळांमधील जनजागृती कार्यक्रम आणि समुदाय सहभागाच्या उपक्रमांद्वारे पावसाळ्याच्या काळात दररोज डासांपासून संरक्षण घेण्या बाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जाणार आहे. डासांमुळे पसरणाऱ्या आजारांपासून बचावाबाबत जनजागृती निर्माण करणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना अंगीकारण्यास प्रोत्साहन देणे, हा ओडोमॉसच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग आहे. ग्राहक शिक्षण आणि समुदाय जनजागृती कार्यक्रमांद्वारे कुटुंबांना डेंग्यू, मलेरिया आणि इतर डासांमुळे पसरणाऱ्या आजारांचा प्रसार करणाऱ्या डासांपासून सुरक्षित राहण्यास मदत करण्याचे उद्दिष्ट ब्रँडने ठेवले आहे. या अभियानांतर्गत संपूर्ण भारतातील शाळांमध्ये विविध उपक्रम राबवले जाणार असून, जनजागृती सत्रांच्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी संवाद साधला जाणार आहे. डेंग्यूचा प्रसार करणाऱ्या डासांपासून प्रभावी संरक्षण कसे मिळवावे, याबाबत त्यांना माहिती देण्यात येणार आहे. या उपक्रमाचा शुभारंभ पुण्यात करण्यात आला. यावेळी सोसायटीमध्ये डॉ. श्रुती साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि देशसेवा फाऊंडेशन च्या मदतीने जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात ३०० हून अधिक नागरिक आणि मुलांनी सहभाग घेतला. या उपक्रमाचे नेतृत्व प्रमुख वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. श्रुती भीमराव साळवे यांनी केले.

ह्यावेळी डॉ. श्रुती साळवे, डाबर इंडिया लिमिटेड चे दिनेश कुमार, देशसेवा फाऊंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. या उपक्रमाबाबत बोलताना डाबर इंडिया लिमिटेडचे होम केअर विभागाचे विपणन प्रमुख वैभव राठी म्हणाले: "डेंग्यूचा आजार आजही संपूर्ण भारता समोरील एक गंभीर सार्वजनिक आरोग्य आव्हान आहे. मात्र, डेंग्यूचा प्रसार करणारे डास दिवसा सक्रिय असतात, याबाबतची जनजागृती अजूनही मर्यादित आहे.

# माणुसकी व कृतज्ञ भावनेतून साधलेली प्रगती समाजहिताची

## दत्तात्रय वारे गुरुजी यांचे प्रतिपादन; दिशा परिवाराच्या वतीने २५० गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान

पुणे : (स. गांवकरी)

"शिक्षणाचे व्यापारीकरण होत असताना माणुसकीच्या भावनेतून गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्यासाठी शेकडो दाते पुढे येत आहेत. त्यांच्या विश्वासाला सार्थ ठरत विद्यार्थ्यांनी प्रगतीच्या मार्गावर चालताना कृतज्ञ भावनेतून पुन्हा या कार्यात जोडून घेतले, ही सकारात्मक गोष्ट आहे. माणुसकी आणि कृतज्ञता याची सांगड घालणारा दिशा परिवाराचा हा उपक्रम स्तुत्य आहे," असे प्रतिपादन राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित दत्तात्रय वारे गुरुजी यांनी केले. महाराष्ट्रातील प्रत्येक सरकारी शाळेला गुणवत्तापूर्ण आणि जागतिक दर्जाचे शिक्षण




देणारी संस्था बनविण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे, असे परखड मत त्यांनी मांडले.

दिशा परिवार चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित २० व्या शैक्षणिक शिष्यवृत्ती प्रदान सोहळ्यात दत्तात्रय वारे गुरुजी बोलत होते. नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात झालेल्या सोहळ्यात २५० गरजू विद्यार्थ्यांना देणगीदारांच्याच हस्ते शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. मराठवाडा मित्र मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. भाऊसाहेब जाधव समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रसंगी एबीपी माझाचे मुख्य संपादक राजीव खांडेकर, उद्योजक गणेश जाधव, दैनिक प्रभातचे सरव्यवस्थापक रवीकुमार इंडी, माजी सरव्यवस्थापक बी. एल. स्वामी, दिशा परिवाराचे संस्थापक राजाभाऊ चव्हाण, शिष्यवृत्ती प्रदान समारंभ समितीचे अध्यक्ष सुजीत शिंदे, संस्थेचे अध्यक्ष मकरंद कुलकर्णी, कार्याध्यक्ष अरुण कुलकर्णी, विश्वस्त विवेक अगरवाल, सचिव निखिल पडवळ, चिन्मय कुलकर्णी यांच्यासह अन्य पदाधिकारी, विद्यार्थी, देणगीदार उपस्थित होते. दत्तात्रय वारे गुरुजी म्हणाले, "शिक्षणाच्या व्यापारीकरणाला आळा घालण्यासाठी सरकारी शाळा सक्षम व्हायला हव्यात. यासाठी आम्ही काम करीत आहोत. मुलांची शैक्षणिक प्रगती होत नसेल, तर त्याची शंभर टक्के जबाबदारी शिक्षकांनी स्वीकारली पाहिजे. समर्पित शिक्षक, पालक आणि लोकसहभाग यांच्या बळावर सरकारी शाळांमध्ये मोठा बदल घडवून आणता येतो. समर्पित शिक्षक आणि लोकसहभागाच्या जोरावर महाराष्ट्रातील प्रत्येक सरकारी शाळेला जागतिक दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न व्हायला हवा." राजीव खांडेकर म्हणाले, "शिक्षणाच्या बळावर प्रगती करताना ज्यांच्या पाठिंब्यामुळे आणि कष्टांमुळे आपण घडलो, त्यांच्या विश्वासाला सार्थ ठरवत एक संवेदनशील माणूस म्हणून समाजाचे देणे फेडणे, हाच खऱ्या अर्थाने यशाचा आणि प्रगतीचा मार्ग आहे. दिशा परिवारासारख्या संस्थांच्या साथीने अडचणींवर मात करून यशाची शिखरे गाठताना समाज आणि देशाप्रती असलेल्या कर्तव्यांचा विसर पडू देऊ नये.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरुषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)